शनिवार, दि. ५ एप्रिल २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २४२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ऑनलाईन ऐवजी नगद रकमेवर लक्ष ठेवणाऱ्या वाहतुक शाखेच्या भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कारवाई करा

## आमेर खान, सुनील भारती यांच्या आंदोलनाला प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याचा पाठींबा

**जालना । प्रतिनिधी -** हेल्मेट नाही म्हणून ऑनलाईन चलनच्या ऐवजी नगद रक्कम मागत अरेरावीची भाषा वापरल्याप्रकरणी वाहतुक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करत त्याचे निलंबन करण्यात यावे या मागणीसाठी शनिवार (दि ५) रोजी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे आमेर खान, सुनील भारती यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्न डफडं बजाओ बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनास प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने पाठींबा देण्यात आला असून कॉन्सीलचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी कॉन्सीलच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना आंदोलनाच्या स्थळी सकाळी ११ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

यासंदर्भात आंदोलकांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही दि.३०/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.१० वा. सुमारास परतुर येथुन जालना येथे दुचाकी वाहनाने येत होतो. आम्ही डुकरी पिंपरी टोलनाक्याजवळ आलो असता तेथे उभे असलेले ग्रामीण वाहतुक शाखेचे कर्मचारी पोलीस कॉन्स्टेबल २८/जालना यांनी आम्हाला थांबण्यास सांगितले व आम्ही देखील त्यांच्या आदेशानुसार गाडी तात्काळ थांबविली. त्यानंतर त्यांनी आम्हाला हेल्मेट बाबत विचारणा केली, आमच्याकडे हेल्मट नसल्यामुळे त्यांनी आम्हास तात्काळ एक हजार रुपये जमा करा अन्यथा तुम्हाला येथुन जाता येणार नाही असे मुजोरपणे धमकी वजा स्वरुपात सांगितले. त्यावेळी आम्ही त्यांना आमच्याजवळ रोख रक्कम नसल्यामुळे आम्ही त्यांना ऑनलाईन पध्दतीने चलन पाठवावे अशी विनंती केली असता त्यांनी आम्हास स्पष्टपणे नकार देऊन गाडी रस्त्याच्या कडेला घेण्यास सांगुन आमच्या दुचाकीची चावी काढुन घेतली. त्यावेळी आम्ही त्यांना या वर्तनाबाबत विचारणा केली असता त्यांनी आम्हाला रोख स्वरुपात एक हजार रुपये दिले तरच तुम्हाला गाडीची चावी मिळेल व तुम्हाला येथुन जाता येईल नसता तुम्हाला येथुन हलता येणार नाही अशी ताकीद दिली.

आमच्या सोबत तक्रारदार क्र. २ यांचा ३ वर्षाचा लहान मुलगा सोबत होता, तो झोपलेला होता. दुपारच्या कडाक्याच्या उन्हात आम्ही संबंधीत साहेबांना ऑनलाईन चलन पाठविण्याची विनंती केली परंतु त्यांनी आमचे काही एक न ऐकुन घेता उलटपक्षी आम्हाला शिकवतो का असे म्हणुन अरेरावीची भाषा सुरु केली व मोठमोठयाने ओरडायला सुरुवात केली त्यांच्या आवाजामुळे आमच्या सोबत असलेला तीन वर्षाचा लहान मुलगा झोपेतुन जागा झाला व त्यांना घाबरुन मोठमोठयाने रडायला सुरुवात केली परंतु असे असताना देखील संबंधीत पान २ वर




# सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर भाजपा देशात १२ कोटी सदस्य बनविण्याचे लक्ष पूर्ण करेल

## आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला विश्वास

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाने संपूर्ण भारतात आपली राष्ट्रीय सदस्यत्व मोहीम सुरू केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीत 'संघटन पर्व सदस्यत्व अभियान - २०२४' नावाने २०२४ च्या राष्ट्रीय सदस्यत्व स्वीकारले आहे. त्यापाठोपाठ अन्य अनेक नेत्यांनीही भाजप सदस्यत्वाचे नूतनीकरण केले आहे. या मोहिमेद्वारे सदस्यत्वाची सुविधा देण्यासाठी भाजपने ८८००००२०२४ हा मिस कॉल नंबर देण्यात आला असून नमो पद्वारे देखील पक्षामध्ये सामील होऊन सदस्यत्व स्वीकारण्याची व्यवस्था पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या सर्व संघटन पर्वदरम्यान प्रत्येक जिल्हास्तरावर मंडल स्तरावर तसेच बूथ स्तरावर पक्षाची नोंदणी करण्यात आली आहे. या संघटन परवा मध्ये भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ते तन-मन-धनाने सहभागी झालेले आहेत त्यामुळे भारतीय जनता पक्षाने १२ कोटी सदस्य नोंदणीचे ठरवलेले उद्दिष्ट लवकरच पूर्ण होईल व भारतीय जनता पक्ष पुन्हा एकदा जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल असा विश्वास माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज व्यक्त केला.



भारतीय जनता पार्टीच्या संघटन पर्व या संघटनात्मक उपक्रमाच्या निमित्ताने माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची छत्रपती संभाजी नगर शहर जिल्हा निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यानिमित्त भाजपा छत्रपती संभाजी नगर शहर जिल्हा कार्यालय येथे आयोजित बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी सक्रिय सदस्य व प्राथमिक सदस्य नोंदणी यासह बूथ समिती गठित करण्यासंदर्भात आढावा घेतला. यावेळी मंचावर संघटन मंत्री संजय कौडगे, मंत्री अतुल सावे आ.संजय केनेकर शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर किशोर पवार संजय खंबायते, प्रदेश सचिव किरण पाटील दिलीप थोरात यांच्यासह प्रदेश पदाधिकारी जिल्हा पदाधिकारी मंडल अध्यक्ष उपस्थित होते.

भारतीय जनता पक्ष केवळ जगातील सर्वात मोठा पक्ष नाही तर राजकीय पक्षांमध्येही अद्वितीय आहे. भाजपा हा एकमेव पक्ष लोकशाही पद्धतीने दर ६ वर्षांनी सदस्यत्व मोहीम राबवतो. पक्षाच्या या मोहिमेमध्ये पक्ष कार्यकर्त्यांनी तन-मन धना ने काम केले असून पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावरच भारतीय जनता पक्ष जगातील क्रमांक एकचा पक्ष होता आणि यापुढे देखील राहील. प्रत्येक लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता यांनी स्वतःवर सोपवलेली जबाबदारी निश्चितपणे पार पाडणे अपेक्षित असून ही जबाबदारी पार पाडल्यास भारतीय जनता पक्षाचे प्राथमिक सदस्यता नोंदणी चे दिलेले उद्दिष्ट सहज पूर्ण होईल त्याचप्रमाणे प्रत्येक बुथवर किमान तीन सक्रिय सदस्य बनवणे अपेक्षित आहे त्यामुळे प्रत्येक विधानसभा निहाय सक्रिय सदस्य संख्या देखील निश्चित करू देण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रत्येक सदस्याने किमान ५० प्राथमिक सदस्य नोंदणी करणे अपेक्षित आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगतप्रकाश नड्डा जी यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात ६ एप्रिल आजपा स्थापना दिवस व १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेष अभियान योजना अंतर्गत खालील कार्यक्रमांचे आयोजन करुन साजरे करण्यासंदर्भात पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून सूचना देण्यात आली आहे. ३, ४ व ५ एप्रिल, २०२५ रोजी महाराष्ट्र भाजपा संघटन पर्व अभियान अंतर्गत प्रत्येक मंडल विधानसभा प्राथमिक सदस्यता पान २ वर

# जिल्हा प्रशासनाने लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवूनच विकास कामे करावीत

## राज्यमंत्री योगेश कदम यांच्या सूचना




**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासन जिल्हा प्रशासनातील विविध विभागामार्फत जिल्ह्यातील विविध विकास कामे पार पाडत असते. जिल्ह्यातील विकास कामे करतांना जिल्हा प्रशासनातील विभागानी आपल्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेवूनच विकास कामे करावीत अशा सूचना राज्याचे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिल्या.

जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित आढावा बैठकीत राज्यमंत्री श्री. कदम हे बोलत होते. यावेळी आमदार अर्जून खोतकर, आमदार हिकमत उढाण, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदिश मिणियार, पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खेडकर, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

अन्न औषध प्रशासन विभागाचे कामाकाज अपेक्षेप्रमाणे होत नसल्याची नाराजी व्यक्त करुन, यावेळी श्री. कदम म्हणाले की, बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत जिल्ह्यातील कामगारांना दोन वेळचे जेवण मोफत उपलब्ध करून दिले जाते, ते कामगारांना वेळेवर मिळते का ? तसेच त्या भोजनातील अन्नाचे परिक्षण किंवा तपासणी करण्यात येते का ? जिल्ह्यातील औषध विक्रीच्या पान २ वर

## संपादकीय

### प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रूजवणारा कलाकार



हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# बुलडोझर चालविणे म्हणजे बहाद्दूरकी नाही; त्यात माणुसकी हवी

उत्तरप्रदेशच्या प्रयागराज विकास प्राधिकरणाने केलेली बुलडोझर कारवाई अमानवी,बेकायदेशीर आणि मानवी हक्कांना बाधा पोहोचविणारी आहे. कारवाईमुळे आपला विवेक डळमळीत झाला असून प्रशासनाने सहा आठवड्याच्या आत प्रत्येकाला १० लाखांची भरपाई द्यावी असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने १ एप्रिलला दिला. न्या.अभय एस.ओक आणि न्या.उज्वल भुयान यांच्या न्यायालयाने २०२१ मध्ये प्रयागराज येथे करण्यात आलेल्या कारवाईवर सुनावणी करताना म्हटले की, देशातील लोकांची निवासी घरे अशा प्रकारे पाडता येत नाही. आम्ही हे संपूर्ण प्रकरण बेकायदेशीर म्हणून नोंदवत आहोत.देशातील कोणतीही सरकार असो फक्त बुलडोझरची कारवाई केल्याने किंवा चालविल्याणे कोणीही मोठ होत नाही किंवा कोणतेही समाधान निघत नाही किंवा बुध्दीमान होत नाही किंवा बहादुर होत नाही.मानुस हा बुध्दीजीवीप्राणी आहे त्यामुळे आपल्या बुद्धीचा वापर विचारपूर्वक,जाणिवपूर्वक व योग्य व्हायला पाहिजे आणि त्याचा गैरवापर होऊ नये याकडेही तेवढेच तिक्ष्ण लक्ष देणे गरजेचे आहे.कारण छोटीशी चुक मोठा आघात करून जातो व हा एवढा मोठा आघात असतो की या जखमा मरेपर्यंत मिटत नाही.याचे जिवंत उदाहरण आपण प्रयागराजमध्ये पाहीले.ही बुलडोझरची घटना अंगावर शहारे येणारी व १४० कोटी जनतेला स्तब्ध करणारी दिसून आली.कारण या कारवाईत माणुसकीच्या संपूर्ण सिमा ओलांडल्याचे दिसून आले ही अत्यंत दुःखद व चिंताजनक बाब आहे.कारण उत्तर प्रदेशात झोपडपट्टीवरील बुलडोझर कारवाई दरम्यान पुस्तके छातीशी कवटाळून धावत घराबाहेर पडणाऱ्या शाळकरी मुलीचा व्हिडिओ पाहून सर्वांनाच धक्का बसला आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.प्रयागराजमधील कारवाई प्रकरणी सुनावणी घेतांना न्यायालयाने समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेल्या आंबेडकर नगरमधील जलालपूरा येथील झोपडपट्टीवरील कारवाईच्या या व्हिडिओची दखल घेतल्याने हे अमानवी कृत्य लक्षात आले. कोणी जर म्हणत असेल की कुठेही बुलडोझर चालवीला तर माझे कोण काय बिघडवेल असे नाही देवाकडे देर है अंधेर नही ही बाब सर्वच राज्य सरकारांना लागु होते.प्रयागराज शहरातील घरांवर करण्यात आलेली बुलडोझर कारवाई अमानवीआणि बेकायदेशीर असल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ एप्रिल २०२५ मंगळवारला उत्तर प्रदेश सरकार आणि प्रयागराज विकास प्राधिकरणाला बुलडोझर कारवाईमुळे आमच्या सदसद्विवेकबुद्धीला धक्का बसल्याचे सांगत सर्वोच्च न्यायालयाने चांगलेच फाईलवर घेतले.प्रयागराज विकास प्राधिकरणाने पाडकामाची कारवाई अमानवीपध्दतीने केली, असे निरीक्षण न्यायमूर्ती अभय ओक आणि उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने १ एप्रिला नोंदवले.शिवाय सहा आठवड्याच्या आत प्रत्येक घरमालकाला १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश उत्तर प्रदेश सरकारला दिले. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे आणि नागरिकांची निवासस्थाने अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत असेही सर्वोच्च न्यायालयाने सुनावले.कोणतीही कारवाई असो त्याचा सखोल अभ्यास करूनच केली पाहिजे. कारण उत्तरप्रदेशातील बुलडोझरने झोपड्या उद्ध्वस्त केल्या जात असताना एक आठ वर्षांची मुलगी पुस्तके हातात घेऊन झोपडीततून पळून जात असतानाच्या अलीकडील व्हिडिओने सर्वांनाच धक्का आहे. अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी या हृदयद्रावक प्रसंगावर भाष्य केले आणि ही बाब सहाजिकच आहे. कारण उच्च न्यायालयच नाही संपूर्ण जग या गोष्टीला माफ करू शकत नाही.देशातील राज्य सरकारांना वाटत असेल की ज्या-ज्या ठीकाणी अवैधरित्या झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत. त्या-त्या ठिकाणची संपूर्ण सहनिशा सरकारने करावी व संपूर्ण झोपडपट्टी वासियांसाठी सर्वप्रथम रहाण्याची व्यवस्था करावी जेणेकरून उत्तरप्रदेशातील घटनेचा पुनरावृत्ती होणार नाही याचीही काळजी संपूर्ण राज्य सरकारांनी घेणे गरजेचे आहे. कारण प्रयागराज मधील धक्कादायक कारवाई पहाता देशातील राज्य सरकारांचे डोळे अवश्य उघडले असेल असे मला वाटते.राज्य सरकारांनी देशातील बाहुबली समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या घरावर बुलडोझर अवश्य चालविला पाहिजे कारण तीथे भरपूर काही मिळु शकते.देशातील धक्कादायक बाब म्हणजे २५१ खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत तरीही ते स्वतःला लोकप्रतिनिधी म्हणतात. त्याचप्रमाणे एका माहितीनुसार जाहीर केलेल्या एका स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत ही धक्कादायक बाब सामोर आली आहे. अशाप्रकारे आजी-माजी आमदार-खासदारांवर जर गुन्हेगारी खटले असतील व त्यांच्याजवळ करोडोंची संपत्ती असेल तर देश खोकला होणार नाही तर काय!आज देशातील ८० टक्के आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ करोडोंची चल-अचल संपत्ती आहे.सोबतच खंडणी वसूलीसाठी अनेक आका सुध्दा यांनी पोसुन ठेवले आहेत. आज आपण यांचा विचार केला तर देशातील ८० टक्के मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती देशाच्या १४० कोटी जनतेला ५ वर्षे पुरेल इतकी आहे. परंतु कायदे-कानुन बनविणारे हेच असल्याने यांच्यावर कठोर कारवाई होत नाही किंवा बुलडोझर सुध्दा चालत नाही ही स्वतंत्र भारताची शोकांतिका आहे.न्या.अभय ओक व न्या.उज्वल भुयान यांच्या न्यायपीठाने सांगितले की घटनेच्या कलम-२१ नुसार निवाऱ्याचा मूलभूत अधिकार आहे. नागरिकांची घरे अशा प्रकारे पाडली जाऊ शकत नाहीत. म्हणजेच अन्न,वस्त्र आणि निवारा आवश्यक आहे.यातील निवारा किती महत्त्वाचा आहे ही बाब प्रयागराजच्या घटनेवरून लक्षात येते.देशातील राज्य सरकारांना खरोखरच बुलडोझर कारवाई करायची असेल तर माफिया राज चालविणाऱ्यांवर करावी, खंडणी वसूल करणाऱ्यांवर व त्यांना खतपाणी घालणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनवर करावी, भ्रष्टाचाऱ्यांवर करावी, भ्रष्ट अधिकाऱ्यांवर करावी याचे स्वागत देशातील तळागाळातील संपूर्ण लोक करतील. कारण यांच्या जवळ वाजविपेक्षा हजारोंच्या पटीने चल-अचल संपत्ती आहे. गरीब व सर्वसामान्यांनजवळ रहाण्यापुरते फक्त स्वतःचे घर असते किंवा किरायाने रहातात किंवा झोपडीत रहातात. यांच्या तुलनेत राजकीय पुढारी, भ्रष्टाचारी यांचा विचार केला तर गरीब व सर्वसामान्य व्यक्ती शुन्य असल्याचे दिसून येते.मी देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती करतो की कोणतीही बुलडोझर कारवाई करतांना सामाजिक बांधिलकी ठेवून करावी जेणेकरून कोणाचेही घर हिसकावल्या जाणार नाही किंवा कोणी उघड्यावर कोणी येणार नाही याची काळजी अवश्य घ्यावी. कारण निवाऱ्याचा मूलभूत अधिकार सर्वांनाच आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## जि.प.उच्च प्राथमिक शाळा सावरगाव म्हस्केचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - डिसेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे च्या वतीने घेण्यात आलेल्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक( छ.च.च.ड.)परीक्षेत सावरगाव म्हस्के शाळेचे १७ पैकी १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.यापैकी १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत असून ६ विद्यार्थांना सारथी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळेल.एकंदर १७ पैकी १६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल. परीक्षेत रोहिणी गणेश म्हस्के, वैष्णवी रामेश्वर म्हस्के ,वैष्णवी प्रवीण म्हस्के



पवन अंकुश म्हस्के , कोमल गजानन म्हस्के, रूषाली अरुण म्हस्के,सुस्मित सुनील म्हस्के,प्रीती राजेंद्र म्हस्के, ऋषिकेश श्रीकृष्ण म्हस्के, युवराज समाधान म्हस्के, ऋतुजा परसराम म्हस्के, वैष्णवी कृष्णा म्हस्के, जयश्री नामदेव म्हस्के, प्रांजल विठ्ठल म्हस्के ,ओम कृष्णा म्हस्के, दिपाली शिवाजी म्हस्के, आदर्श सुनील म्हस्के हे विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आत्माराम म्हस्के, उपाध्यक्ष नंदकिशोर काकडे समितीचे सर्व सदस्य स्पर्धा परीक्षा विकास मंचचे पंजाब दांदडे, नारायण पिंपळे, मुख्याध्यापक मुरलीधर वायाळ, वर्ग शिक्षिका श्रीमती सुनीता देशपांडे, काकासाहेब बनकर, मुकेशसिंह ठाकूर, सिद्धेश्वर लंगोटे, श्रीमती लता चापाईतकर, श्रीमती अंकिता धारगावे, कैलास जाधव, अर्जुन राऊत व गावकरी यांनी अभिनंदन केले.

## जालन्यातून दोन दिवसांपूर्वी गायब झालेल्या तरुणीचा एका विहिरीत मृतदेह आढळला

### जालना शहरातील घटनेनं एकच खळबळ

**जालना । प्रतिनिधी** - जालन्यातून दोन दिवसांपूर्वी गायब झालेल्या तरुणीचा एका विहिरीत मृतदेह आढळला आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर जालना शहरात खळबळ उडाली आहे. सीमा भगवान पाडळे (वय १९ वर्ष रा. योगेशनगर जालना) असे मयत तरुणीचे नाव आहे. सीमा पाडळे ही तरुणी आपल्या योगेशनगर भागातील राहत्या घरातून ३१ मार्च रोजी गायब झाली होती. याप्रकरणी तालुका जालना पोलिसांनी मिसिंगची नोंद करून, तिचा शोध सुरू केला होता. दरम्यान, जालना पोलीस मुख्यालयाच्या पाठीमागे असलेल्या एका विहिरीत सदर तरुणीचा मृतदेह तरंगताना आढळून आलाय. दरम्यान, पोलिसांनी अग्निशमन दलाच्या मदतीने हा मृतदेह बाहेर काढून जिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी हलविला आहे. सदर तरुणीने आत्महत्या केली की तिचा घातपात झाला..? यादृष्टीने आता पोलीस तपास करीत आहेत. दरम्यान, जालना शहरातील या धक्कादायक घटनेनं एकच खळबळ उडाली आहे.

पान १ वरुन

## ऑनलाईन ऐवजी...

पोलीसांच्या वर्तनात कोणताही बदल झाला नाही. याउलट त्यांनी आम्हाला सांगु लागले की, आम्ही येथे आमची डयुटी करत आहोत, तुला जेवढे सांगिते तेवढे कर, तु आम्हाला एक हजार रुपये नगदी दे, नसता तुला येथुन जाता येणार नाही, एवढेच नाही तर तुला आमच्या विरुध्द काय तक्रार करायची, कोणाला करायची तर कर आमचं कुणी काही वाकडं करु शकत नाही असे म्हणुन आम्हाला जोरजोरात अपशब्द वापरुन आम्हास अपमानास्पद वागणुक दिली. संबंधीत पोलीस हे अरेरावीची भाषा करत असल्यामुळे आम्ही अधिकचा वाद होऊ नये म्हणुन आम्ही त्यांना पत्रकार असल्याचे सांगितले. परंतु त्यांनी आम्ही पत्रकार असताना देखील ते आम्हाला म्हणाले की, तुम्ही पत्रकार असले म्हणुन काय झालं आमचं तुम्ही काही वाकडं करु शकत नाही, तुम्हाला काय करायचे ते करुन घे अशी धमकी दिली. आम्ही त्यांना विनंती केली की, आम्हाला जाऊ द्या आम्ही तुम्हाला ऑनलाईन एक हजार रुपये पाठवितो, परंतु त्यांनी नगदी स्वरुपात एक हजार रुपये दिले तरच तुम्हाला सोडतो नसता तुम्हाला येथुन जाता तर काय हालता सुध्दा येणार नाही अशी धमकी शर्टच्या गुंड्या उघडुन दिली.

सदर घटना चालु असताना आम्ही तात्काळ त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री रेतुरवार साहेब यांना फोन लावुन संबंधीत घटने बाबत माहिती दिली असता त्यांनी आम्हाला सांगितले मी त्यांना बोलतो असे सांगितले, त्यामुळे आम्ही संबंधीत वाहतुक शाखेच्या कर्मचाऱ्या सोबत अधिक न वागता शांत बसलो, परंतु आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्याला फोन करुन सुचित केल्याची माहिती दिल्याने त्यांनी या गोष्टीचा राग मनात धरुन आम्हाला म्हणाले की, तुम्ही माझ्या साहेबांना सांगितले, ते साहेब देखील माझे काही वाकडे करु शकत नाही व मी कोणलाही भीत नाही असे म्हणाले. त्यानंतर आम्ही मौजपुरी पोलिस स्टेशन येथे जालना येथे समक्ष जावुन तक्रार अर्ज दिलेले आहे. जो सदर तक्रार अर्जासोबत जोडलेला आहे.

यावरुन ही बाब अगदी स्पष्ट होते की, संबंधीत पोलीस कॉन्स्टेबल हे मुजोअर पणे व बेकायदेशीरपणे नियमबाह्य पध्दतीने पदाचा गैरवापर करुन अवैधरित्या पैशाची मागणी करुन सर्वसामान्य जनतेकडुन बेकायदेशीरपणे रक्कम उकळुन स्वतःचा खिशात भरत आहेत. त्यामुळे संबंधीत पोलीस कॉन्स्टेबल विरुध्द तात्काळ गुन्हा दाखल करुन त्यांना नौकरीवरुन निलंबीत करण्यात यावे. तसेच त्यांच्या बँक खात्याचा तपशील तपासण्यात यावा. तसेच या पुर्वी देखील अशा प्रकारचे बेकायदेशीर रक्कम वसुल केल्या असल्याचा संभव असल्याने टोल नाक्या समोरील सर्व सीसीटिव्ही फुटेज तपासण्यात यावे जेणेकरुन संबंधीत पोलीस कॉन्स्टेबल यांनी बेकायदेशीर पैशांचा केलेला काळाबाजार उघड होण्यास मदत होईल.

संबंधीत पोलीस कॉन्स्टेबल यांच्या विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी यापुर्वी मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना जिल्हाधिकारी जालना मार्फत निवेदन दिले होते. मात्र यावर कोणतीही कारवाई न झाल्यामुळे दिनांक ०५/०४/२०२५ रोजी एक दिवसीय लाक्षणिक डफडं वाजुन अर्धनग्न बोंबा मारो आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनानंतरही पंधरा दिवसांत पोलीस कॉन्स्टेबल निलंबन केले नाही तर दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी बेमुदत उपोषण करण्याचा ईशाराही आंदोलनाकांनी दिला आहे.

## सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या ...

उदिदष्ट १००% पूर्ण करणे, प्रत्येक मंडल विधानसभा सक्रिय सदस्यता उदिदष्ट १००% पूर्ण करणे, मंडल विधानसभा निहाय १००% बूथ समिती गठीत करून घेणे, जिल्ह्यातील सर्व मंडल निवडणूक रचनेप्रमाणे मंडलाचे अध्यक्ष निवडणुकीसाठी प्रवास पूर्ण करणे आवश्यक आहे. असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले.

भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता, पदाधिकारी, नेता, मा. आमदार, मा. खासदार, मा. मंत्री आपल्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्ष अभियानात सहभागी होणार असून सर्वांनी आपले उदिदष्ट १००% पूर्ण करणे आवश्यक आहे. भाजपा सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या घरावर पक्षाचा झेंडा फडकवायचा आहे. पक्षाचे कार्यालय सजवून गोड पदार्थांचे वाटप करायचे आहे. स्थापना दिनाच्या निमित्ताने ६ एप्रिल ला कार्यालयात प्रदर्शनी लावायची आहे. दुपारी बरोबर २ वाजता स्थापना दिवस संघटन पर्व यशस्वी केल्यावर 'संघटन पर्व संवाद' मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस कार्यकर्त्याशी संवाद साधणार आहेत. तसेच प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे कार्यकर्त्यांशी संवाद करून अभिनंदन करणार आहेत. एवढेच नव्हे तर प्रत्येक नवीन मंडलात विविध कार्यक्रम साजरे केले जाणार असल्याचे देखील यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले. या बैठकीदरम्यान आमदार लोणीकर यांनी क्रांती चौक मंडळ, सातारा देवळाई मंडळ, पडेगाव मंडळ, गारखेडा मंडळ, कैलासनगर मंडळ, सिडको मंडळ, हडको मंडळ, गुलमंडी मंडळ, चिकलठाणा मंडळ, बेगमपुरा मंडळ व पदमपुरा मंडळ येथील प्राथमिक सदस्य नोंदणी सक्रिय सदस्य नोंदणी व बुथ समितीचा आढावा घेतला. यावेळी सुरेश बनकर, जालिंदर शेंडगे प्रवीण कुलकर्णी अशोक मुळे लक्ष्मीकांत थेटे शिवाजी दांडगे सागर पाले सिद्धार्थ साळवे दीपक खोतकर अनिल मकरिये दीपक ढाकणे, गोविंद केंद्रे सचिन गुगळे यांच्यासह भाजपाच्या महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## जिल्हा प्रशासनाने ...

दूकानावरुन नशेच्या गोळ्यांची विक्री होत असून, यामुळे तरुण युवक नशेच्या आहारी पडत आहे. याबाबत संबंधीत औषध विक्रेत्यांवर अन्न औषध प्रशासन विभागाने काय कारवाई केली ? तसेच दूध भेसळ करणाऱ्यावर किती कारवाई करण्यात आल्या ? तसेच अन् औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईचा सविस्तर तपशिल सादर करण्याचे निर्देश श्री. कदम यांनी संबंधितांना यावेळी दिले. तसेच उमेद अंतर्गत महिला बचत गटांनी पारंपारिक उद्योग सोडून, नाविन्यपूर्ण उद्योग सुरु करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच महिला बचत गटासाठी मॉलचे प्रस्ताव तयार करुन, तात्काळ शासनाकडे सादर करुन त्यासाठी पाठपुरवठा करावा. तसेच जिल्ह्यातील ज्या ग्राम पंचायती मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पुढील ३० वर्ष पाण्याचे नियोजन करुन १०० टक्के कामे झाली आहेत, अशा ग्राम पंचायतीनी ठराव दिले आहेत का ? काम पूर्ण झालेल्या ग्राम पंचायतींना आता टँकरची आवश्यकता पडू नये, अन्यथा या सर्व कामांची चौकशी करण्यात येईल. तसेच ज्या ग्राम पंचायतीच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्या संबंधीत कंत्राटदारांवर कारवाई करुन त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे का ? अशी विचारणा करुन, जी कामे अपूर्ण आहेत, ती लवकरात लवकर पूर्ण करावीत. तसेच जिल्ह्यात होणारी विकास कामे, योजना, प्रकल्पांची माहिती लोकप्रतिनिधींना वेळोवेळी उपलब्ध करून द्यावीत. तसेच सदर कामे लोकप्रतिनीधीना विश्वासात घेवूनच करावीत, अशा सूचना ही श्री. कदम यांनी यावेळी दिल्या. जिल्हा पुरवठा विभागाने त्यांना प्राप्त झालेल्या इष्टांक नुसार, नवीन नावे समाविष्ट करण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. तसेच जिल्ह्यात आयपीएल सामान्यावर सट्टा लावण्याचे प्रकार वाढत असुन याद्वारे गुन्ह्याचे प्रमाण वाढत आहेत, याकरीता पोलीसांनी जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था अबाधीत राहवी याकरीता संबंधीताचा शोध घेवून कठोर कारवाई करावी. तसेच सर्व विभागांनी मुख्यमंत्री यांचा शंभर दिवस कार्यक्रम यशस्वीपणे राबवावा. ई-पीक पाहणी आणि ग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणीसाठी विशेष शिबीरांचे आयोजन करावेत. संपुर्ण जिल्हा परिषदेत १०० टक्के ई-ऑफीस प्रक्रिया राबविण्याचे निर्देश श्री. कदम यांनी यावेळी दिले.

यावेळी श्री कदम यांनी जिल्हा परिषद, अन्न औषध प्रशासन विभाग, पुरवठा विभाग, कायदा सुव्यवस्था आदी विभागाचा आढावा घेतला. आमदार अर्जून खोतकर आणि आमदार हिकमत उढाण यांनी देखील यावेळी विविध विभागाकडून जिल्ह्यातील पाणी पुरवठा, कायदा सुव्यवस्था आदींचा आढावा संबंधीतांकडून घेतला. यावेळी आढावा बैठकीस जिल्हा प्रशासनातील विविध विभाग प्रमुखाची उपस्थिती होती.

## मंत्रालयात पत्रकारांना मज्जाव - 'व्हॉईस ऑफ मीडिया'कडून तीव्र निषेध!

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्य सरकारने घेतलेला मंत्रालयातील पत्रकारांच्या प्रवेशावरचा नवा निर्णय हा लोकशाही व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारा आहे. आतापर्यंत पत्रकारांना सकाळी १० ते संध्याकाळपर्यंत नियमितपणे मंत्रालयात प्रवेश मिळत होता. मात्र, आता फक्त दुपारी २ नंतरच प्रवेश मिळेल, असा नवा आदेश गृह विभागाच्या वतीने काढण्यात आला आहे. हा निर्णय म्हणजे हुकूम शाहीचा उगम आहे. सरकारला पत्रकारांची भीती का वाटते? याचा स्पष्ट प्रश्न 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक अध्यक्ष श्री. संदीप काळे यांनी उपस्थित केला आहे.

या संदर्भात गृह विभागाचे कक्षा अधिकारी डॉ. प्रवीण डिकले यांच्या स्वाक्षरीने पत्र जारी करण्यात आले असून, सर्व पत्रकारांना फक्त दुपारी २ नंतरच मंत्रालयात प्रवेश मिळेल, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.


पत्रकारांना थांबवणं म्हणजे लोकशाहीला गप्प करणं आहे. पत्रकारिता ही सरकारवर नियंत्रण ठेवणारी चौथी सत्ता आहे. पत्रकारच मंत्रालयात उपस्थित राहून प्रशासनाचा कारभार, मंत्र्यांचे निर्णय आणि सामान्य जनतेशी संबंधित गोष्टींचा वेध घेतात. अशा वेळी पत्रकारांनाच मंत्रालयाबाहेर ठेवण्याचा निर्णय हा धोकादायक आणि हुकूमशाही वृत्तीचा आहे. मंत्रालयात पत्रकारिता आहे म्हणून राज्य सुरक्षित आहे. जर याच पत्रकारांना प्रवेश नसेल, तर पत्रकारिता कोणासाठी आणि कुणासाठी करायची? असा सवाल संदीप काळे, (संस्थापक अध्यक्ष, व्हॉईस ऑफ मीडिया) यांनी उपस्थित केला आहे.

या प्रकरणी श्री. संदीप काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संपूर्ण घडामोडी त्यांच्यासमोर मांडल्या आहेत. त्यांनी स्पष्ट शब्दांत कळवलं आहे की, हा निर्णय जर सरकारने तातडीने मागे घेतला नाही, तर 'व्हॉईस ऑफ मीडिया' मंत्रालयासमोर आंदोलन छेडणार आहे. हे राज्य सर्वसामान्यांचे आहे, हुकूमशाहीचे नाही! अशा ठाम शब्दांत श्री. काळे यांनी सरकारला धारेवर धरले आहे. जर हा निर्णय मागे घेतला नाही, तर 'व्हॉईस ऑफ मीडिया' या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्यावतीने संपूर्ण महाराष्ट्रात राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.









**जालना येथे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन व विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे दरेगाव येथील महेश आत्माराम ढवळे व कृष्णा जीवन बकाल यांच्यासह असंख्य युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. यावेळी उपस्थित जिल्हाध्यक्ष बद्रीभाऊ पठाडे, गोवर्धन कोल्हे, संजय डोंगरे, कृष्णा गायके, सतीश केळकर, गणेश खरात, नागेश अंभोरे, दौलत भुतेकर, ओम कळकुंबे, आत्माराम ढवळे, अमोल तिरुखे, शिवा ढवळे आदि उपस्थित होते.**

# मागील ३ दिवसापासून ९५ वॉटर ग्रीडचा वीज पुरवठा बंद

## लोणीकरांनी मजीप्राच्या अधिकाऱ्यांना खडसावले

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील ९५ गाव वॉटर गिड चा वीजपुरवठा मागील तीन दिवसांपासून बंद असून ९५ गावाला मिळणारा पाणीपुरवठा बंद पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आज रोजी जलकुंभात पाणी असल्यामुळे या गावांना पाणी सुरळीत मिळत आहे परंतु जलशुद्धीकरण केंद्राचा वीज पुरवठा बंद असला तर पुढील एक दोन दिवसात जलकुंभात शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ शकणार नाही परिणामी ९५ गावातील सर्व सामान्य नागरिकांना पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. यासाठी पूर्णपणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी जबाबदार असून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले.

मंठातील १३२ केवी मधून आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून जलशुद्धीकरण केंद्रासाठी वीजपुरवठा करण्यात आला परंतु मागील तीन दिवसांपासून हा वीज पुरवठा खंडित झाला आहे या संदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांनी महावितरणचे अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता १३२ केवी पासून जलशुद्धीकरण केंद्राच्या पॅनल पर्यंत वीजपुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता वीज वितरण यांनी दिली. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या पॅनल मध्ये असलेला बिघाड ही कार्यकारी अभियंता उप अभियंता व शाखा अभियंता यांची जबाबदारी असून त्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सदरील वीजपुरवठा व त्यामध्ये असलेला बिघाड यात सुधारणा होऊ शकली नाही या सदर्भात आमदार बबनराव लोणीकर यांनी जीवन प्राधिकरण च्या पॅनल मध्ये झालेला बिघाड तात्काळ शोधून वीजपुरवठा सुरू करण्यासंदर्भात कडक शब्दात सूचना केली आहे



मागील तीन दिवसाच्या सुट्ट्या मध्ये कार्यकारी अभियंता उप अभियंता व शाखा अभियंता वॉटर ग्रीड योजनेकडे फिरकलेले नाहीत त्यामुळे त्यांना या संदर्भात कुठलीही माहिती नाही असे चित्र स्पष्ट झाले आहेत मुळात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता तिन्ही उपअभियंता व सर्व शाखा अभियंता हे मुख्यालयी न राहता छत्रपती संभाजी नगर येथे राहतात त्यामुळे वॉटर ग्रीड सारख्या महत्त्वकांक्षी योजनेकडे संबंधित अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव यांनी मागील दोन बैठकांमध्ये सातत्याने संबंधित सर्व अधिकाऱ्यांना मुख्यालय राहण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या परंतु सदस्य सचिवांच्या या सूचनांना या अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली आहे.

# जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणीचे आयोजन

अंबड । प्रतिनिधी - जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव ता अंबड आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षा साठी आयोजित करण्यात येणाऱ्या १९ वर्ष वयोगटाच्या आतील मुले कबड्डी या खेळासाठी दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.00 वाजता मंडळाच्या मैदानावर जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे.या निवडचाचणी साठी ज्या विद्यार्थ्यांची जन्मतारीख ०१.०१ २००७ आहे आणि बारावी पर्यंत शिकत आहे अशा जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि निवड चाचणी मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्या वतीने संजय येळवंते, दिनेश वाघ,विठ्ठल दिवटे,रोहित बिन्नीवाले,अजय काळवणे,आकाश दिवटे इत्यादींनी केले आहे

# देवेंद्र भुजबळ यांना रोटरी पुरस्कार जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी -** प्रसार माध्यमे आणि समाज माध्यम ंद्वारे समाज कल्याणासाठी निवृत्ती पश्चातही सातत्याने योगदान देत असल्याबद्दल रोटरी इंटरनॅशनल या जगातील सर्वात मोठ्या, १२० वर्षे जुन्या स्वयंसेवी संस्थेच्या नवी मुंबई शाखेतर्फे देवेंद्र भुजबळ यांना व्यावसायिक नैपुण्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

नवी मुंबईत येत्या रविवारी होणार असलेल्या एका मोठ्या समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे रोटरी इंटरनॅशनल संस्थेच्या, नवी मुंबई सिवुड्स शाखेचे अध्यक्ष कपिल अगरवाल यांनी कळविले आहे.



श्री भुजबळ हे वृत्त पत्रकारिता, दूरदर्शन, आकाशवाणी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि त्यानंतर व्यक्तिशः प्रसार माध्यमे आणि समाज माध्यमांद्वारे, प्रेरणादायी पुस्तके लिहून समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करीत आहेत.

# भाजपा स्थापना दिनानिमित्त जालना जिल्हयात विविध कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीची स्थापना दिनांक ६ एप्रील १९८० रोजी झालेली आहे त्यामुळे ६ एप्रील हा भाजपाचा स्थापना दिवस आहे त्यानिमित्त माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते व सर्व भाजपा प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सकाळी ठिक १०.00 वाजता भाजपा ध्वजारोहण कार्यक्रम भाजपा जिल्हा कार्यालय,जालना येथे संपन्न होणार आहे.

दिनांक ६ एप्रील रोजीच श्रीराम नवमी आहे हा दुग्धशर्करा योग आहे, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे यांच्यासह सर्व प्रमुख भाजपा पदाधिकारी बंधु भगिनीं यांच्यासह दुपारी १२.00 वाजता शहरातील प्रमुख श्रीराम मंदीरात दर्शन भेटी घेण्यात येणार आहेत.

गेल्या तिन चार महिण्यापासून भाजपाचा सक्रिय सदस्यता अभियान चालु आहे त्यामध्ये प्रदेश भाजपाला दिलेले १.५ कोटी भाजपाचे प्राथमिक सदस्य करण्याचे उद्यीष्ट दिनांक ३ एप्रील २०२५ रोजी पुर्ण झाले आहे. तसेच जालना जिल्हा सदस्यता अभियानात प्रदेशात पाचवा क्रमांक आल्याने माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना.रावसाहेब पाटील दानवे हे दुपारी १.00 वाजता भाजपा कार्यालय,जालना येथे उपस्थित राहुन व मा.ना.देवेंद्रजी फडणवीस,मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित राहून भाजपा कार्यकर्त्यांचे अभिनंदन व मार्गदर्शन करणार आहेत.

सर्व भाजपा कार्यकर्त्यांनी आपले घर,प्रतिष्ठांन,कंपणी,उद्योग,भाजपा स्थानिक कार्यालय या ठिकाणी स्थापना दिनानिमित्त भाजपा ध्वज लावावेत व ६ एप्रील स्थापना दिनाच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहवे,हि विनंती,भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात येत आहे.

# कवी सुनील उबाळे यांना सौ. सुभद्राबाई काळे मुद्रा साहित्य पुरस्कार घोषित

**जालना । प्रतिनिधी -** दरवर्षी साहित्य सेवा संस्था व काळे परिवार यांच्या वतीने सौ. सुभद्राबाई काळे राज्य साहित्य पुरस्कार देण्यात येतो. यंदाचा हा पुरस्कार छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध कवी सुनील उबाळे यांना घोषित करण्यात आला आहे. कवी सुनील उबाळे गेल्या कित्येक वर्षापासून कविता लेखनासह जगण्याचा मनस करत आहे.कित्येक साहित्य संमेलनात व विविध साहित्य मंचावरून त्यांनी काव्यवाचन केलेले आहे. तसेच 'उलट्या कडीचं घर' हा त्यांचा लक्षवेधी कवितासंग्रह प्रकाशित आहे.कवी सुनील उबाळे यांना त्यांच्या साहित्यातील समग्र योगदानासाठी सौ.सुभद्राबाई काळे राज्यस्तरीय पुरस्कार घोषित करण्यात आला आहे.पाच हजार रुपये रोख रक्कम, स्मृतीचिन्ह,शाल, श्रीफळ आणि यथोचित सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप असुन मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक कवी कैलास भाले, आयोजक बंडू काळे यांनी दिली आहे. यावेळी लालचंद काळे, राजेंद्र काळे, मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे रमेश देहेडकर, सुनील लोणकर,प्रा. पंढरीनाथ सारके, मनीष पाटील, सुधाकर वाहुळे, शिवाजी तेलंगे यांची उपस्थिती होती



## युवा आदर्श

### मूर्ख व्यक्ती ...

आत्मघात करायची
पतंगाची मुर्ख वृत्ती
जळून व्हावे खाक
कसली अंध भक्ती
नाक कापे अपशकून
व्हावी दुजांची दुर्गती
अपाय करता दुजा
स्व हस्ते रे अधोगती
धोंडा पाडे पायावरी
वाया घालवी शक्ती
आत्मा भटकत राही
कशी मिळणार मुक्ती
राज्य करे मुर्खावरती
बसला काटेरी तख्ती
दुस्वास करावा सतत
विष भिनलेले रक्ती
भरलेल्या रे संसारात
आठवे फुका विरक्ती
पळपुटेपणा रूजला
हव्यास नजरा तख्ती
अर्धी लाकडे मसणा
का घेत नाही निवृत्ती
सूर्यास्ताच्या समयास
जीवना का आसक्ती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

जे. ई.एस. महाविद्यालयात सर्जनशीलता आणि नाविन्य या विषयावर एक दिवसीय नवलेखक कार्यशाळेचा संपन्न

# डिजीटल युगात भाषिक कौशल्यावर रोजगाराची संधी उपलब्ध - डॉ. मीरा निचले

**जालना । प्रतिनिधी -** नवीन शैक्षणिक धोरणावर जेव्हापासून चर्चा सुरू झाली असून, तेव्हापासून नावीन्य हा शब्द चर्चेत आला आहे. सृजनाच्या क्षेत्रात सतत नवीन आणि त्याची सर्जनशील अभिव्यक्ती स्वीकारणे म्हणजे सर्जनशील नवनिर्मिती होय. ही नवनवीनता स्वीकारून जी भाषा आणि साहित्य पुढे सरकते, ती भाषा आणि तिचे साहित्य विकसित होते आणि सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असते. वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ट्रान्सलेशन अँड सिलेक्शनच्या प्राध्यापिका डॉ.मीरा निचले यांनी सांगितले.

जे.ई.एस. महाविद्यालय, जालना आणि श्रीमती दानकुवर महिला महाविद्यालय जालना, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्जनशीलता आणि नाविन्य या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करण्यात आली या एकदिवसीय नवीन लेखक कार्यशाळेत विशेष अतिथी म्हणून डॉक्टर मीरा निचले , बोलत होत्या. आज, डिजिटल युगाने विद्यार्थी आणि तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक नवीन संधी खुल्या केल्या आहेत, त्यांना फक्त त्या खुल्या मनाने पाहण्याची आणि त्यांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. भाषेच्या क्षेत्रात करिअर करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता डिजिटल युगात नोकरीच्या मागे धावण्याची गरज नाही, रोजगार आपोआप त्यांच्यापर्यंत पोहोचेल. एक काळ असा होता की कविता लिहिल्यानंतर गुलाबाच्या फुलासोबत कविता नोटबुकमध्ये बंद करून ठेवावी लागे आणि ती प्रकाशित करण्यासाठी त्यांना प्रकाशक मिळेना. पण आज या नव्या माध्यमांमुळे कोणताही कवी आपल्या सादरीकरण कौशल्याने देशाच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकतो. असेही डॉक्टर निचले यांनी सांगितले.

कार्यशाळेचे उद्घाटन जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री म्हणाले की,जालना हे बहुभाषिक शहर असल्याने विविध मातृभाषा असलेली कुटुंबे येथे राहतात. परस्पर संवादासाठी ते फक्त हिंदी भाषेचा वापर करतात. त्यामुळे जालन्यात हिंदी सक्तीने नव्हे तर स्वेच्छेने स्वीकारली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने करिअरच्या नवीन संधी शोधण्याची गरज आहे. असे मत त्यांनी उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

या कार्यशाळेच्या वक्त्या धर्माबाद येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ.प्रतिभा येरेकर म्हणाल्या की, सर्जनशीलता ही भावनांची यशस्वी अभिव्यक्ती आहे. अभ्यासक्रमांची रचना करताना विद्यापीठात थीमॅटिक इनोव्हेशन लक्षात ठेवले जाते.शैक्षणिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणही मिळाले पाहिजे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार विद्यापीठांच्या अभ्यासक्रम समित्या अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांना सातत्याने अभ्यासक्रमांमध्ये जोडत असतात. काळाची गरज लक्षात घेऊन सुधारणा आणि निर्मितीचा हा उपक्रम निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आज नवीन शैक्षणिक धोरणात इनोव्हेशन हा शब्द ठळकपणे वापरला गेला आहे. विद्यार्थ्यांनी हा नवोपक्रम स्वीकारून सर्जनशीलतेला नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असेही डॉ.प्रतिभा येरेकर यांनी सांगितले


यावेळी जे ई एस महाविद्यालयाचे हिंदी विभाग विभागप्रमुख डॉ.नानासाहेब गोरे म्हणाले की, बदललेल्या परिस्थितीनुसार महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित शिक्षकांच्या मूल्यमापनाच्या पद्धती दिवसेंदिवस बदलत आहेत. महाविद्यालय आणि त्यात सेवा देणारे प्राध्यापक नवीन तंत्रज्ञानाशी कितपत जोडलेले आहेत आणि ते नवीन तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत कसा वापर करत आहेत, याचे सातत्याने मूल्यमापन केले जात आहे. विद्यार्थ्यांनीही नाविन्यपूर्णतेच्या माध्यमातून या नवीन तंत्रज्ञानाशी जोडले जाणे आवश्यक आहे. जेव्हा शिक्षक स्वतः नवकल्पना आत्मसात करतील आणि त्यांची शिकवण्याची कौशल्ये वेळेवर आणि सुसंगत बनवतील तेव्हाच विद्यार्थी नाविन्यपूर्ण प्रक्रियेशी जोडू शकतील. त्यामुळे केवळ विद्यार्थ्यांनीच नाही तर शिक्षकांनीही नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण क्षमतेने अध्यापन करणे गरजेचे आहे., असेही डॉ.गोरे यांनी सांगितले

या प्रस्तावावर आपल्या भाषणात दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना येथील हिंदी विभागप्रमुख प्रा. पार्वती देशमुख म्हणाल्या की, आजची शिक्षणपद्धती तंत्रज्ञानासोबत कौशल्यावर आधारित आहे. कौशल्य आणि तंत्रज्ञानाच्या संयोगाने रोजगाराच्या नवीन संधी शोधण्यासाठी विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित केले पाहिजे, म्हणून विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांमध्ये या कौशल्यांचा समावेश केला आहे.

विद्यार्थ्यांना याविषयी व्यावहारिक माहिती मिळावी म्हणून आम्ही ही कार्यशाळा आयोजित केली असल्याचेही डॉक्टर देशमुख यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय समारोप समारंभात दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर तळेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कला आणि कलागुणांना वाव देणे ही महाविद्यालयाची प्राथमिक गरज आहे. या कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आकार देण्याचे प्रकार घडू शकतात. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल आणि ते नवीन कौशल्याकडे सखोल अभ्यास सुरू करतील.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सीमा गुप्ता यांनी केले तर उपस्थित आमचे आभार डॉ.वैशाली श्रीमंडळे यांनी मानलेत. या कार्यशाळेत डॉ.जयश्री वाडेकर, डॉ.प्रवीण चंदनशिवे, डॉ.विद्या पटवारी, डॉ.गजानन देशमुख यांच्यासह प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.